महाराष्ट्र शासन
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जावक क्रमांक : तंशिविकापु/विवि-५/२०२२/ 553 दिनांक : 03 FEB 2022

## परिपत्रक

प्रति,
संचालक/प्राचार्य,
तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील (सातारा जिल्ह्यातील)
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित / खाजगी विनाअनुदानित संस्था
पुणे विभाग.

**विषय** — **दिनांक २५ जानेवारी, ते १० फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करणेबाबत....**

**संदर्भ** — १) मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचे पत्र क्र.साशा/ग्रापंनि/आरआर/१/कावि-१७५/२२ सातारा दि. २४-०१-०२०२२
२) मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र.रानिआ/माजअ-२०२२/प्र.क्र.१/का-१०, दि.१८ ०१ २०२२

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये आपणांस कळविणेत येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी वरील संदर्भिय पत्रान्वये दि.२६,जानेवारी, ते १० फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत **"लोकशाही पंधरवडा"** साजरा करणेबाबत निर्देशित केलेले आहे. त्यास अनुसरुन आपणांस कळविणेत येते की,

१. आपल्या संस्थामध्ये प्रथम वर्षामध्ये म्हणजेच सन २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्याकडून प्रवेश अर्जामध्ये **"१८ वर्षे पूर्ण झालेबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे"** या आशयाचे प्रमाणपत्र घेणेत यावे व असे किती विद्यार्थ्यांकडून प्रमाणपत्र घेणेत आलेले आहेत याबाबत **मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा** या कार्यालयास अवगत करावे.

२. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये **"लोकशाहीची मुलभूत तत्वे व मतदानाचे प्रमाण वाढविणे तसेच लोकशाहीची मुलभूत तत्वे, राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व व वैशिष्ट्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व यांचे महत्व"** याबाबत आपल्या संस्थांमध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक यांच्या भाषणांचे आयोजन करणेत यावे. तसेच प्रस्तुतबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल **मा.जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा** या कार्यालयास पाठविणेत यावा.

३. आपल्या संस्थामध्ये **"लोकशाहीची मुलभूत तत्वे व मतदानाचे प्रमाण वाढविणे"** लोकशाहीची मुलभूत तत्वे, राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व व वैशिष्ट्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व या विषयावर ऑनलाईन पध्दतीने निबंध, वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन इ. स्पर्धांचे आयोजन करणे

लोकशाही पंधरवडा साजरा करताना जिल्ह्यातील कोरोनाची परिस्थिती विचारात घेऊन यंदाचा लोकशाही पंधरवडा लोकांची गर्दी होईल, अशा पध्दतीने साजरा करण्याऐवजी केवळ ऑनलाईन, अपारंपारिक आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून तसेच कोरोनाबाबातच्या प्रोटोकॉलचे काटेकोरपालन करुन सदर पंधरवडा साजरा करणेत यावा. सदर लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासाठी आपले स्तरावरुन राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांबाबतचा तपशीलवार अहवाल आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह मा. जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा या कार्यालयास सादर करणेत यावा.

(डॉ. द. व्यं. जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे

सोबत - मा. उपजिल्हाधिकारी महसूल, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांचे पत्र

प्रत -: या कार्यालयातील प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करणेसाठी

RPAD

**महत्त्वाचे/तात्काळ**

जिल्हाधिकारी कार्यालय सातारा
क्र. साशा/ग्रापंनि/आरआर/१/कावि-१७५/२२
सातारा, दि.२४/०१/२०२२

प्रति,

१. **मा. कुलसचिव, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

२. **मा. सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे** 411005

३. **मा. विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर**

४. **मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई**

५. **मा. प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, सातारा**

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
पुणे.
02 FEB 2022
आवक क्र. 2२०४

**विषय :- दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी २०२२ या कालावधीत "लोकशाही पंधरवडा" साजरा करणेबाबत.**

संदर्भ :- मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचेकडील पत्र क्र.रानिआ/माजअ-२०२२/ प्र.क्र.१/का-१०, दि. १८/०१/२०२२

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणास कळविणेत येते की, मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांनी वरील संदर्भिय पत्रान्वये दि. २६ जानेवारी ते १० फेब्रुवारी, २०२२ या कालावधीत **"लोकशांही पंधरवडा"** साजरा करणेबाबत निर्देशित केलेले आहे. त्यासअनुसरुन, आपणास कळविणेत येते की,

१. सातारा जिल्ह्यातील आपले अखत्यारित येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये प्रथम वर्षामध्ये म्हणजेच सन २०१७-१८ मध्ये प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांकडून प्रवेश अर्जामध्ये "**१८ वर्षे पूर्ण झालेबरोबर मी माझे नाव मतदार यादीत नोंदवून घेणार आहे**"; या आशयाचे प्रमाणपत्र घेणेत यावे व असे किती विद्यार्थ्यांकडून प्रमाणपत्र घेणेत आलेले आहेत, याबाबत या कार्यालयास अवगत करणेत यावे.

२. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये **"लोकशाहीची मूलभूत तत्वे व मतदानाचे प्रमाण वाढविणे"** तसेच **लोकशाहीची मुलभूत तत्वे, राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व व वैशिष्ट्ये, स्थानिक**

**स्वराज्य संस्थांचे महत्व** यांचे महत्व याबाबत आपल्या अखत्यारित येणाऱ्या सर्व महाविद्यालयांमध्ये राज्यशास्त्राचे प्राध्यापक यांच्या भाषणांचे आयोजन करणेबाबत सर्व संबंधितांना आपलेस्तरावरुन सूचना देणेत याव्यात. तसेच प्रस्तुतबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल या कार्यालयास पाठविणेत यावा.

३. आपले अखत्यारित येणाऱ्या विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये **"लोकशाहीची मुलभूत तत्वे व मतदानाचे प्रमाण वाढविणे" लोकशाहीची मुलभूत तत्वे, राज्य निवडणूक आयोगाचे दायित्व व वैशिष्ट्ये, स्थानिक स्वराज्य संस्थांचे महत्व** या विषयावर ऑनलाईन पध्दतीने निबंध, वक्तृत्व, वादविवाद, कथाकथन इ. स्पर्धांचे आयोजन करणे.

लोकशाही पंधरवडा साजरा करताना जिल्ह्यातील कोरोनाची परिस्थिती विचारात घेऊन यंदाचा लोकशाही पंधरवडा लोकांची गर्दी होईल, अशा पध्दतीने साजरा करण्याऐवजी केवळ ऑनलाईन, अपारंपारिक आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून तसेच कोरोनाबाबातच्या प्रोटोकॉलचे काटेकोरपालन करुन सदर पंधरवडा साजरा करणेत यावा. तसेच लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासंदर्भात सोबत जोडलेल्या **परिशिष्ट १, २ व ३** चे अवलोकन करुन त्यानुसार आवश्यक ती कार्यवाही करणेत यावी. सदर लोकशाही पंधरवडा साजरा करण्यासाठी आपले स्तरावरुन अगर आपले अखत्यारितील शैक्षणिक संस्थांकडून राबविण्यात आलेल्या विविध उपक्रमांबाबतचा तपशीलवार अहवाल आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह या कार्यालयास सादर करणेत यावा, ही विनंती.

**स्थळप्रतीवर**
मा. जिल्हाधिकारीसो
यांची स्वाक्षरी असे

**आपला विश्वासू,**

(प्रशांत आवटे)
**उपजिल्हाधिकारी महसूल**
**जिल्हाधिकारी कार्यालय सातारा**

**प्रत:-** १) मा. अवर सचिव, राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांना माहितीसाठी सविनय सादर.
२) मा. विभागीय आयुक्त, पुणे विभाग पुणे (सामान्य प्रशासन विभाग/नगरविकास विभाग) यांना माहितीसाठी सविनय सादर.